# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक :
०२०–२५६९११२३३
२५६०१२५८
२५६०१२५९

**शैक्षणिक विभाग**
गणेशखिंड, पुणे–४११ ००७
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
फॅक्स : ०२०–२५६९८००७
वेबसाइट : www.unipune.ac.in
इ–मेल : dyracademic@unipune.ac.in

संदर्भ क्र. : सीए/ ३८७८

दिनांक : १८/११/२०१६

प्रति,
मा. प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्नीत अभियांत्रिकी / वास्तुशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र व तत्सम

विषय : डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, ता. माणगाव, जि. रायगड या विद्यापीठास राज्यातील व्यावसायिक (अभियांत्रिकी / वास्तुशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र व तत्सम) अभ्यासक्रम राबविणा–या संस्था / महाविद्यालयांना तंत्रशास्त्र विद्यापीठास संलग्नीत होण्याकरिता राज्यातील अकृषि विद्यापीठांनी ना हरकत दाखला देणेबाबत...

महोदय / महोदया,

वरील विषयास अनुसरुन मा. उपसचिव, महाराष्ट्र शासन यांनी निर्गमित केलेले पत्र क्र. तंशावि–३७११ / (९८३ / १६ / तां.शि.–२), दि. १७/११/२०१६ आपल्या माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे.

कळावे,

आपला,

१८/११/१६

उपकुलसचिव
(शैक्षणिक विभाग)

सोबत : वरीलप्रमाणे

महाराष्ट्र शासन

क्रमांक — तंशावि-३७११/ (१८३/१६/तां.शि.-२
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन,
मुंबई - ४०००३२,
दिनांक -१७/११/२०१६

प्रति,

सर्व कुलगुरु
अकृषि विद्यापिठे,

विषय :-डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, ता. माणगांव, जि. रायगड या विद्यापीठास राज्यातील व्यावसायिक (अभियांत्रिकी, औषध निर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र व तत्सम) अभ्यासक्रम राबविणा-या संस्था / महाविद्यालयांना तंत्रशास्त्र विद्यापिठास संलग्नित होण्याकरीता **राज्यातील अकृषि विद्यापिठांनी ना हरकत दाखला देणेबाबत....**

महोदय,

राज्याच्या प्रगतीत तंत्रशिक्षणाचे महत्त्व ओळखून राज्यातील व्यावसायिक (अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र व तत्सम) अभ्यासक्रम (व्यवस्थापनशास्त्र अभ्यासक्रम वगळुन) राबविणाऱ्या विविध संस्था / महाविद्यालये राज्यातील विविध ११ अकृषि विद्यापीठांच्या कार्यकक्षेत कार्यरत आहेत. राज्यातील तंत्रशिक्षणाचा दर्जा उंचाविणे व इतर बाबी विचारात घेऊन राज्य शासनाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियम,२०१४ अनुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाची स्थापना केली आहे. सदरचा अधिनियम दिनांक १/३/२०१६ च्या अधिसुचनेन्वये अस्तित्वात आला आहे. सदर तंत्रशास्त्र विद्यापीठाचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्रभर निर्धारीत करण्यात आलेले आहे.

राज्यात कार्यरत पारंपारिक विद्यापीठांच्या कार्यक्षेत्रात अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, वास्तुशास्त्र परिषद तथा औषधनिर्माणशास्त्र परिषदेच्या अखत्यारितील व्यवस्थापनशास्त्र वगळता इतर पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम राबविणाऱ्या विविध संस्था / महाविद्यालये डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे जि. रायगड अथवा संबंधित पारंपारिक विद्यापीठे यापैकी संस्था / महाविद्यालयांच्या इच्छेनुसार एका विद्यापीठाची संलग्नता घेण्याची तरतुद डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियम,२०१४ अन्वये करण्यात आली आहे. त्यानुसार महाराष्ट्र विद्यापीठ कायदा - १९९४ च्या खंड ६(२) ते (४) मध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. सदर सुधारणा या डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापिठ अधिनियम, २०१४ मधील अनुसूची -३ येथे स्पष्टपणे नमूद केल्या आहेत.

त्यानुसार महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ च्या व डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियम,२०१४ च्या तरतुदींच्या अनुषंगाने आपणास असे कळविण्याचे मला निदेश आहेत कि, राज्यातील पारंपारिक विद्यापीठांच्या कार्यक्षेत्रात कार्यरत असणा-या अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, वास्तुशास्त्र परिषद तथा औषधनिर्माणशास्त्र परिषदेच्या अखत्यारितील व्यवस्थापनशास्त्र वगळता इतर अभ्यासक्रम राबविणाऱ्या ज्या पदवी व पदव्युत्तर पदवी महविद्यालय / संस्थांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे जि. रायगड या विद्यापिठाकडे संलग्नित होण्याकरीता आपल्या विद्यापिठाकडे **"ना हरकत प्रमाणपत्र"** देण्याची विनंती केली आहे, **त्या संस्थांना तात्काळ "ना हरकत प्रमाणपत्र" नियमाप्रमाणे देण्याची आवश्यक कार्यवाही करावी. सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाच्या संलग्नतेकरिता दिनांक २१/११/२०१६ ही शेवटची मुदत असल्याने प्राथम्याने कार्यवाही करण्याचे आपणास कळविण्यात येत आहे.**

**(डॉ. किरण पाटील)**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा. राज्यपाल तथा कुलपती यांचे प्रधान सचिव, राजभवन मलबार हिल,मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे जि. रायगड
६. कुलगुरु, सर्व अकृषि विद्यापीठे
७. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे / डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे जि. रायगड
८. उपसचिव (विशि) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. अध्यक्ष, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली
१०. अध्यक्ष, भारतीय औषध निर्माणशास्त्र परिषद, नवी दिल्ली
११. अध्यक्ष, वास्तुशास्त्र परिषद, नवी दिल्ली
१२. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई
१३. निवड नस्ती.